॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## EXAMINATIONS DEPARTMENT

Phone: (02462) 215294
Fax : (02462) 215520

Website: www.srtmun.ac.in

E-mail: directorboee@gmail.com
directorboee@srtmun.ac.in

संदर्भ: परीक्षा/व्यावसायीक अभ्यासक्रम/अवि/२०२५–२६/४४६५ दि.२६/०५/२०२५

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
प्राचार्य
सर्व संलग्नित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

विषयः– उन्हाळी – २०२५ च्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षीक परीक्षे बाबत

संदर्भः– : या कार्यालयाचे प्रत्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक क्र.४४५६, दि.२२/०५/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या उन्हाळी –२०२५ च्या प्रत्यक्षिक परीक्षां या दिनांक २७/०५/२०२५ ते ०६/०६/२०२५ दरम्यान होणार असल्याचे आपणास विदितच आहे. सदर प्रकरणी संदर्भीय प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळापत्रकानुसार बहिस्थ परीक्षेकांची नामनिर्देशित यादी सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास ईमेलद्वारे पुरविण्यात आलेल्या आहेत त्यानुसार संबंधित महाविद्यालयात प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात दिलेल्या वेळापत्रकात किंवा बहिस्थ परीक्षेकांना दिलेल्या महाविद्यालयात कोणताच बदल होणार नाही

तेंव्हा सर्व सलंग्नीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील बहिस्थ प्राध्यापकांना वेळापत्रकाप्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षेच्या कामी इतर महाविद्यालयात जाण्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे त्यासाठी कोणतीही सबब ग्राहय धरली जाणार नाही. **महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६, कलम ४८(४) अन्वये परीक्षचे काम (लेखी किंवा प्रात्यक्षिक) करणे बाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे.**

**तसेच, कलम ८९ अन्वये परीक्षेचा निकाल ३० दिवसांच्या आत जाहीर करणे बंधनकारक आहे**. त्यामुळे या पत्राद्वारे आपणास कळविण्यात येते की, सर्व संबंधित विषय शिक्षकांना प्रात्यक्षीक परीक्षेच्या कार्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करावे. जेणेकरुन परीक्षेचे काम वेळेत होईल व निकाल कालमर्यादेत जाहीर करता येईल. अन्यथा संबंधिताविरुध्द नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. तसेच जे महाविद्यालय वरिल कार्यात सहभागी होणार नाहीत अशा महाविद्यालयाचे निकाल राखीव ठेवण्यात येतील व त्यासाठी संबंधित महाविद्यलय जबाबदार राहील.

स्वा/–
**प्र–संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव: ०१. मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा.प्र–कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.